कलाकार म्हणून झाला आहे. तसेच त्याच उच उडा क्रिडा मार्गदर्शक म्हणून अजित पवार व खेळाशी संबंधीत एकुण ३० विद्यार्थी १४ क्रिडा शिक्षक यांनाही सहकलाकार म्हणून चित्रपटात काम करण्याची संधी मिळत आहे. या चित्रपटाचे चित्रीकरण दिनांक ३० एप्रिल पासुन विश्वात्मक जंगली महाराज आश्रम ट्रस्टच्या आत्मा मालिक शैक्षणिक व क्रिडा संकुलात सुरूझाले आहे.तसेच अहमदनगर जिल्हयातील विविध ठिकाणी या चित्रपटाचे चित्रीकरण होणार आहे. चित्रपटाचे चित्रीकरण तसेच अभिनेते यांना जवळुन पाहण्याचा योग कोपरगाव व राहाता परिसरातील सिनेरसिकांना आला आहे. या निवडीबद्दल सुदर्शन पाटील या विद्यार्थ्याचे व क्रिडा शिक्षकांचे विश्वात्मक जंगली महाराज आश्रम ट्रस्टचे अध्यक्ष नंदकुमार सुर्यवंशी, सर्व विश्वस्त, संत परिवार, प्राचार्य माणिक जाधव, मिनाताई काकडे, उपप्राचार्य नितीन सोनवणे व शिक्षक वृंद आदिंनी अभिनंदन केले.

धनगर समाजाने मतं दिली ...(पान १ वरून)

संघात धनगराच्या गावात मी खाली आलोया, अन ब्राह्मणाच्या आळीला ७० हजार लीड घेतलंय, मराठ्यांच्या आळीला लीड घेतलंय.

मला पक्ष काढल्यानंतर सर्व समाजाला सोबत घेऊन जावं लागतं. एकट्या जातीवर होत नसतं.धनगर समाजाला आरक्षण मिळावं यासाठी आमचे केंद्रीय पातळीवर प्रयत्न सुरु आहेत. याशिवाय मराठा आरक्षणासाठी आम्ही प्रयत्न करत आहोत. नुकत्याच झालेल्या एनडीएच्या बैठकीत मी मोदींना धनगर आरक्षणाबाबत विनंती केली, असं जानकर म्हणाले.

माजी मुख्यमंत्री पृथ्वीराज चव्हाण यांच्यामुळेच मराठा समाज आरक्षण रखडलं, असा आरोप त्यांनी केला. आरक्षणाबाबत गोंधळाची परिस्थिती निर्माण झालेली आहे. त्यामुळे घिसाडघाई करून काही फायदा नाही, असं जानकरांनी नमूद केलं.

यावेळी जानकरांनी स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे नेते खासदार राजू शेट्टी आणि सदाभाऊ खोत यांच्यातील वाद सोडवण्यासाठी प्रयत्न सुरु असल्याचं सांगितलं. मी मध्यस्थी करुन सर्वांना एकत्र आणणार असल्याचं जानकर म्हणाले.

डॉ. विजयकुमार गावित यांच्यावर..(पान १ वरून)

पाचपुते, शरद गावित आणि राजेंद्र गावित यांना पुराव्यांअभावी दोषमुक्त केले आहे. विशेष म्हणजे, आदिवासी विकास खात्यातील योजनांवर अधिकाऱ्यांचे कोणतेही नियंत्रण नाही आणि ठेकेदार देत असलेल्या योजनाच राबवल्या जात असल्याचा धक्कादायक प्रकार या अहवालातून पुढे आला आहे.

सन २००४ ते २०१४ या दरम्यान आदिवासी विकास खात्यातर्फे झालेल्या खरेदी घोटाळ्याची चौकशी करण्यासाठी गुलाब पवार यांनी मुंबई उच्च न्यायालयात दाखल जनहित याचिकेनंतर कोर्टाने माजी न्यायमूर्ती निर्मूलनासाठी लिक्विड प्रोटीनची खरेदी झाली होती. हे लिक्विड प्रोटीन कुपोषित बालकांपर्यंत पोहोचलेच नसल्याची तक्रार याचिकाकर्त्यांनी केली होती.

पालघरमधील हिंदुस्तान लॅबोरेटरी या कंपनीतून ही खरेदी करण्यात आल्याचे प्रतिज्ञापत्र महिला व बालकल्याण खात्याचे सहायक आयुक्त संजय बागूल यांनी या समितीपुढे दिले. मात्र, या खरेदीसाठी आदिवासी विकास खात्यातर्फे वितरित करण्यात आलेल्या निधीची फाइलच गायब असल्याचे आयोगाने त्यांच्या अहवालात नोंदवले आहे.

त्याप्रमाणे २००७-०८ या वर्षात डॉ. विजयकुमार गावित यांच्या आदेशाने निविदा प्रक्रियेस छेद देऊन आदिवासी विकास खात्याने १५,०६३ रुपयांची ऑइल इंजिन्स १९,२०० रुपयांना खरेदी केल्याचा ठपका आयोगाने ठेवला आहे. या खरेदीत सरकारचे ३,९०,८६,३७६ रुपयांचे नुकसान झाल्याचे आयोगाचे म्हणणे आहे. त्याचप्रमाणे या ऑइल इंजिन्सची वाहतूक आणि फिटिंग याच्या नावाने १४ कोटी ८९ लाख ५३ हजार ६०० रुपयांचा गैरव्यवहार झाल्याचे या अहवालात नमूद करण्यात आले आहे. यासाठीचा ठेका दिलेल्या आशादीप या संस्थेने इंजिन्स बसवलीच नाहीत, असा शेरा आयोगाने दिला आहे. त्यामुळे त्यांच्याकडून १,९५,८८,९५० रुपये वसूल करण्याची शिफारस केली आहे. गॅस शेगड्यांच्या खरेदीतही सरकारचे ३,६५,०३,६१० रुपयांचे नुकसान झाल्याचे आयोगाचे म्हणणे आहे. २७, ६०२ गॅस शेगड्यांचे बेकायदेशीर वितरण करण्यात आल्याचे आयोगाच्या चौकशीत सिद्ध झाले आहे. यात ७,३२,२०,८४० रुपयांचा गैरव्यवहार झाल्याचा ठपका गायकवाड आयोगाने ठेवला आहे. याच्या लाभार्थी निवडीत दारिद्र्यरेषेखालील पात्रता धुडकावणे, १ वर्षाची योजना १० वर्षेसुरू ठेवणे, निविदा न काढता थेट खरेदी करणे, व्यवहाराच्या नोंदी आणि हिशेब न ठेवणे, काही ठेकेदारांवर मेहेरनजर ठेवणे, त्यांनी दिलेल्या योजना राबवणे, त्यांच्या अंमलबजावणीवर

सनथनगर एन्टरप्रायझेस लिमिटेड
सीआयएन क्र.:एल९९९९९एमएच१९४७पीएलसी२५२७६८
नोंदणीकृत कार्यालय: ४१२, ४था मजला, १७जी वर्धमान चेंबर, कावसजी पटेल रोड, हॉर्निमन सर्कल, फोर्ट, मुंबई-४००००१. दुरध्वनी:०२२-६१३३४२४२, फॅक्स:९१-२२-२३०२४५५०
वेबसाईट: www.sanathnagar.in, ई-मेल : Investors.sel@lodhagroup.com

सूचना
सेबी (लिस्टिंग ऑब्लिगेशन्स अॅण्ड डिस्क्लोजर रिक्वायरमेंट्स) रेग्युलेशन्स २०१५ च्या नियम ४७ सहवाचिता नियम २९ नुसार येथे सूचना देण्यात येत आहे की, ३१ मार्च, २०१७ रोजी संपलेल्या वर्षाकरिता कंपनीचे लेखापरिक्षीत वित्तीय निष्कर्ष विचारात घेणे व मान्यता देणे आणि लाभांशाची शिफारस करणे याकरिता मंगळवार दिनांक २३ मे, २०१७ रोजी कंपनीच्या संचालक मंडळाची सभा होणार आहे.
सदर सूचना ही कंपनीच्या www.sanathnagar.in वेबसाईटवर आणि स्टॉक एक्सचेंज च्या www.bseindia.com वेबसाईटवर उपलब्ध आहे.
वरील व्यवसायानुसार प्रतिभूतीमध्ये व्यवहाराकरिता कंपनीचे व्यापार खिडकी ०६ मे, २०१७ ते २७ मे, २०१७ (दोन्ही दिवस समाविष्ट) पर्यंत बंद ठेवण्यात येतील.

सनथनगर एन्टरप्रायझेस लिमिटेडकरिता
सही/-
पूर्णिमा पावले
संचालक
डीआयएन: ०६७०५१३३

ठिकाण: मुंबई
दिनांक: ०६.०५.२०१७

नॅशनल स्टॅण्डर्ड (इंडिया) लिमिटेड
सीआयएन: एल२७१०९एमएच१९६२पीएलसी२६५९५९
नोंदणीकृत कार्यालय: ४१२, ४था मजला, १७जी, वर्धमान चेंबर, कावसजी पटेल रोड, हॉर्निमन सर्कल, फोर्ट, मुंबई-४००००१. दूर.:+९१-२२-२३०२४४०० फॅक्स: +९१-२२-२३०२४५५०
वेबसाईट : www.nsil.net.in, ई-मेल : Investors.nsil@lodhagroup.com

सूचना
सेबी (लिस्टिंग ऑब्लिगेशन्स अॅण्ड डिस्कोजर रिक्वायरमेंट्स) रेग्युलेशन्स २०१५ च्या नियम ४७ सहवाचिता नियम २९ नुसार येथे सूचना देण्यात येत आहे की, ३१ मार्च, २०१७ रोजी संपलेल्या वर्षाकरिता कंपनीचे लेखापरिक्षीत वित्तीय निष्कर्ष विचारात घेणे व मान्यता देणे आणि लाभांशाची शिफारस करणे याकरिता गुरुवार दिनांक २५ मे, २०१७ रोजी कंपनीच्या संचालक मंडळाची सभा होणार आहे.
कृपया नोंद असावी की, सदर बोर्ड मिटिंगबाबत पुढील तपशिल कंपनीच्या सदस्यांना कंपनीची वेबसाईट www.nsil.net.in वर आणि www.bseindia.com बॉम्बे स्टॉक एक्सचेंजच्या वेबसाईटवर उपलब्ध होईल.
वरील व्यवसायानुसार प्रतिभूतीमध्ये व्यवहाराकरिता कंपनीचे व्यापार खिडकी ०६ मे, २०१७ ते २७ मे, २०१७ (दोन्ही दिवस समाविष्ट) पर्यंत बंद ठेवण्यात येतील.

नॅशनल स्टॅण्डर्ड (इंडिया) लिमिटेडकरिता
सही/-
वरूण शाह
कंपनी सचिव व सक्षम अधिकारी
सदस्यत्व क्र.: एसीएस-ए२८९०१

ठिकाण: मुंबई
दिनांक: ०६.०५.२०१७

महावितरण

टेंडर नोटीस

खालील नमुद कामासाठी योग्य ठेकेदारांकडून निविदा मागविण्यात येत आहेत.

कामाचे स्वरूप	भांडुप विभागांतर्गत सी.एम.आर.आय. द्वारे मिटर वाचनाकरीता कंत्राटी निविदा
निविदा क्र.	काअ/भांवि/टेंडर/टी-१२/२०१७-१८
अंदाजे रक्कम	रु. ९५,००,०००/-
इसारा रक्कम	रु. ९५०००/-
विक्रीचा कालावधी	०६ मे २०१७ ते १५ मे २०१७
निविदा उघडण्याची तारीख	१५ मे २०१७ रोजी १५.०० वाजल्यापासून पुढे

वरील निवीदा अर्ज महावितरणच्या www.mahadiscom.in या वेबसाइटवर उपलब्ध आहेत. निवीदा अर्ज फी रू. ५,२५०/- चा डीमांड ड्राफ्ट महावितरणच्या नावे असावा. योग्य स्वरुपात भरलेल्या निवीदा अंतिम तारखेस १५.०० वाजता खुल्या करण्यात येतील.

संपर्क अधिकारी	कार्यकारी अभियंता, म.रा.वि.वि.कं.म., सं. व सु. विभाग, ईश्वर नगर, म.वि.रा. शिंदे मार्ग, भांडुप (पू), मुंबई ४०० ०७८.
दुरध्वनी क्र.	८८७९६२५००८, ९९३०२६९५५४, ९७६९१४०६२०